## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :९९/२०२१/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. वाघ साहेबराव दामू,<br>रा. चर्चचे मागे, गोळीबार नैदान गेट समोर,<br>मालेगाव कॅम्प, ता. मालेगाव, जि. नाशिक. | अव्वल कारकून,<br>तहसिल कार्यालय, मालेगाव,<br>ता. मालेगाव, जि. नाशिक. |

**सुनावणी दिनांक २९/०१/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक १८/०२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २९/०१/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी सर्व पक्षकार अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक १८/०२/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार अद्याप माहिती मिळाली नाही.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक द्वितीय अपील क्रमांक २५९/२०१८/नाशिक वरील निर्णय दिनांक ११/११/२०२० रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसिल कार्यालय, मालेगाव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३०/०८/२०१७ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी.

४) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व आयोगासमोर उपलब्ध असलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाच्या आदेशानुसार दि. ११/१२/२०२० अन्वये वस्तुस्थिती कळविली आहे. त्यामुळे सदर तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, याप्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक ९९/२०२१/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

जावक क्र ओ- 2890 11 SEP 2024